**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०५ मार्च, २०१२.

पहा : १) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. ६.५.२०११.
२) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.२४.८.२०११.
३) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.९.९.२०११.
४) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. १३.९.२०११.
५) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. २१.९.२०११.
६) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. २१.१.२०१२.
७) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. ८.२.२०१२.

## परिपत्रक

वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. ८.२.२०१२ च्या परिपत्रकान्वये २०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदी ८५% मर्यादेत विभागांना वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. यापैकी योजनेतर अर्थसंकल्पीय तरतुदींसाठी या मर्यादेमध्ये वाढ करुन आता दि. ८.२.२०१२ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या २०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदी ९०% मर्यादेत विभागांना वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. योजनांतर्गत तरतुदी पुर्वीप्रमाणेच ८५% मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

२. उपरोक्त दि. ८.२.२०१२ च्या परिपत्रकातील परिच्छेद-२ मध्ये उल्लेख केलेल्या उद्दिष्टांपैकी

अ) ३१-सहायक अनुदाने,

ब) ३२-अंशदाने

क) ३३-अर्थसहाय्य

या उद्दिष्टांखालील निधी आहरीत करतांना आता वित्त विभागाच्या पूर्व अनुमतीची आवश्यकता नाही. तथापि सदर उद्दिष्टांखालील निधी आहरीत करण्यापूर्वी विभागांनी वित्तीय प्राधिकार तपासूनच निधी खर्च करावा. आवश्यक तेथे वित्त विभागाची सहमती प्राप्त करावी. निधी वितरण अथवा खर्चाच्या मंजूरी देण्याविषयीच्या आदेशात योग्य त्या प्राधिकारांचा सुस्पष्ट उल्लेख करावा. या परिपत्रकाचा उल्लेख प्राधिकार म्हणून करता येणार नाही.

ड) ५३-मोठी बांधकामे - निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव म्हणून ठेवावयाचे प्रस्तावित केले असल्यास, अशा प्रकरणी

ई) केंद्राचा निधी प्राप्त झाल्याशिवाय आहरीत करता येणार नाहीत, अशा केंद्रीय अर्थसहाय्य/अनुदानाशी निगडीत तरतुदी यासाठी निधी आहरीत करतांना उपरोक्त परिपत्रकातील तरतुदीनुसार वित्त विभागाची पूर्व अनुमती व त्यानुषंगाने अनौपचारीक संदर्भ क्र. आवश्यक असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सु. प्र. कानडे )**
सह सचिव, वित्त विभाग.

प्रति,

सर्व सह / उप सचिव, अर्थसंकल्प शाखा, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र (VLC Section) मुंबई (२५ प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र (VLC Section) नागपूर (५ प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई (१५ प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती)
संचालक, लेखा व कोषागार, मुंबई (५ प्रती)
निवासी लेखा अधिकारी, मुंबई (५ प्रती)
कार्यासन प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, विशेष कार्य अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, अर्थसंकल्प-३.